

# २४. कापसाचे फवारणी वेळापत्रक

माझा कापसाच्या शेतीतील स्वअनुभव, शास्त्रज्ञांच्या शिफारशी, प्रगतिशील शेतकऱ्यांचे अनुभव, प्रतिपंप फवारणीचा खर्च, एकाच वेळेस अनेक किडींचे नियंत्रण यावर आधारित सर्वसामान्य फवारणी वेळापत्रक पुढील पानावर देत आहे. हे वेळापत्रक प्रत्येक वर्षी जसेचे तसेच लागू होईल, असे सांगता येणार नाही. मात्र, मागील काही वर्षांपासून येणारी कीड, रोग व झाडाच्या अवस्थेनुसार लागणारी संजीवके, विद्राव्य खतांची यामध्ये शिफारस केली आहे. आपल्या आवशक्यतेनुसार याचा वापर करावा. इतर तांत्रिक नावांना पर्यायी व्यापारी नावेसुद्धा समोरच दिली आहेत.

**कीटकनाशके व इतर फवारताना पाण्यात मिसळण्यासाठीची शास्त्रीय क्रमवारी खालीलप्रमाणे वापरावीत. त्यांची शॉर्ट फॉर्म, लाँग फॉर्म व उदाहरणे.**

१) WSG/WDG - Water Soluble Granules/Water Disposal granules
उदा. थायोमिथॉक्झाम

२) S.P. - Soluble Powders उदा. असिफेट, असिटामाप्रीड

३) WP/WSP - Wetable Powders उदा. मेन्कोझेब, कार्बेडायझीन

४) SL - Soluble Concentrates उदा. हेग्झाकोनॅझॉल, इंडोग्झीकार्ब

५) EC - Emulifiable Conceritrates उदा. क्लोरोपायरिफॉस, क्विनॉलफॉस, फ्रोफेनोफॉस

६) PGR - Plant Growth Regulator, Pramoters उदा. ह्युमिक ॲसिड, बायोस्टिमुलंट, नायट्रोबेंझीन

७) WSF - Water Soluble Fertilizers - उदा. १९:१९:१९, युरिया, डी.ए.पी., ई.डी.टी.ए.

टीप– सल्फर व कॉपर एकत्र किंवा दुसऱ्या कीटकनाशकांसबोत वापरू नका. इतर सर्वांचा वापरसुद्धा तपासून मगच फवारा, द्रावण घट्ट झाल्यास फाटल्यास, योग्य मिश्रण न झाल्यास, न विरघळल्यास फवारू नका. एखादा घटक अयोग्य असल्याने असे होऊ शकते. वरील क्रमवारीनुसार पाण्यात मिसळणे फायद्याचे ठरते. मात्र, प्रत्येक वेळेस हे सर्वच फवारावे असे नाही. शक्य झाल्यास एका पंपाचे मिश्रण तयार करून ते योग्य सिद्ध झाल्यास २०० लिटर पाण्यात द्रावण तयार करावे.

## कापूस फवारणी वेळापत्रक

| फवारणी क्र. | कालावधी | समस्या | शिफारशीत फवारणी |
|---|---|---|---|
| पहिली | ३० ते ४५ दिवस | मावा, तुडतुडा, वाढ | मोनोबुस्ट/फॉस्कील–४० मिली<br>+ रिफ्रेश – ४० मिली<br>+ १९:१९:१९ – ७५ ग्रॅम |
| दुसरी | ४५ ते ६० दिवस | फुलकिडा, तुडतुडा जास्त पात्यांसाठी | रोगोबुस्ट किंवा मेटासीस्टॉक – ४० मिली<br>+ झेप – १० मिली<br>+ परिस स्पर्श – २० ग्रॅम |
| तिसरी | ६० ते ७५ दिवस | फुलकिडा, बोंडअळी, तारुण्य वाढव | सरेंडर/प्रोफेक्ससुपर – ४० मिली<br>+ रिहांश /स्लेयरप्रो– १५ मिली<br>+ ॲन्टिऑक्स – ५ मिली<br>+ सल्फर डब्ल्यूडीजी– ४० ग्रॅम |
| चौथी | ७५ ते ८५ दिवस | पांढरी माशी, फुलकिडा, बोंडअळी, दह्या | हॅकर/शिकारी – ४० मिली<br>+ रॉयल्टी – २५ मिली<br>+ सुखई / कॉटॉक प्लस – ३० मिली<br>+ परिस स्पर्श – २० ग्रॅम |
| पाचवी | ८५ ते १०० दिवस | पांढरी माशी, तुडतुडा, बोंडअळी,बोंडाची वाढ दह्या | लॅनो – ४० मिली<br>+ हॅकर/शिकारी – ४० मिली<br>+ भरारी – ७ मिली<br>+ सुखई / कॉटॉक प्लस – ३० मिली |

नोट : १) एखाद्या वेळेस किडीनुसार किंवा परिस्थितीनुसार औषधांमध्ये बदल होऊ शकतो. त्यासाठी तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. २) प्रत्येक घटकाचे आपाआपले वेगळे कार्य आहे व ते एकमेकास पूरक असल्याने औषधीमध्ये बदल करू नये. ३) प्रत्येक फवारणीमध्ये ३ ते ५ औषधी असली तरी त्यांचा एकूण प्रतिपंप खर्च कमीच आहे.